प्रेसनोट दि. ३१/५/२०१८

## देशी बनावटीचे एक पिस्टल व तिन काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखा युनिट १ ने केली अटक

गुन्हे शाखा, युनिट १ पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हयातील आरोपींचा डेक्कन पोलीस स्टेशनचे हद्दीत शोध घेत असतांना पोलीस उप निरीक्षक हर्षल कदम यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे हद्दीत दळवी हॉस्पीटल जवळील समोरच्या गल्लीत सार्वजनिक रोडवर एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल बेकायदेशीरपणे घेवून उभा आहे. सदरची बातमी युनिट १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन भोसले पाटील यांना कळविली असता, त्यांनी लागलीच कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले.

लागलीच आम्ही स्वतः युनिट १ कडील स्टाफसह सदर ठिकाणी छापा मारून बातमी प्रमाणे एका इसमांस ताब्यात घेवून त्याचे नांव पतता विचारता त्याने आपले नांव पत्ता सनी ऊर्फ प्रशांत प्रकाश कोलते, वय २३ वर्षे, रा. स.नं. ६०, सुखसागर नगर, साईनगर, कात्रज, पुणे असे असलेचे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जात एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व तिन जिवंत काडतुसे असा एकुण किं.रु. ५०,१५०/- माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. हर्षल कदम, दिनेश पाटील, पो.शि. तुषार माळवदकर, पो.हवा. रिजवान जिनेडी, प्रकाश लोखंडे, उमेश काटे, महेबुब मोकाशी, राजू पवार, अशोक माने, पो.ना. सचिन जाधव, इम्रान शेख, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, सुधाकर माने, तुषार खडके, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, यांनी केली आहे.